# 6 डिसेंबर

**आजचा सुविचार :**

"यशाजवळ पोहचण्यासाठी कधीही शॉर्टकट नसतो."

**आजचे पंचांग :**

वार – सोमवार

तिथी – मार्गशीर्ष

नक्षत्र – पूर्वाषाढा

सूर्योदय – सकाळी 7.00 वाजता

सूर्यास्त – सायंकाळी 5. 59 वाजता

**आजचे दिनविशेष :**

- महापरिनिर्वाण दिन : 1956 ला भारताचे संविधान समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निधन.
- 2000: थोर समाजसेवक बाबा आमटे यांना राष्ट्रपती के. आर. नारायणन यांच्या हस्ते केन्द्र सरकारचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**आजचे इंग्लिश शब्द :**

1. Peacock - मोर  2. Parrot - पोपट  3. Pigeon - कबुतर  4. Eagle – गरुड

**आजची प्रश्नमंजुषा :**

1) एकूण खंड किती आहेत?
2) आपल्या परिसरात असलेल्या नद्यांची नावे सांगा.
3) समुद्राचे पाणी खारट का असते?
4) काटकोन किती अंशाचा असतो?
5) आपल्याला श्वसनासाठी कोणता उपयोगी ठरतो?

डॉ. आंबेडकर माहिती विडीओ पहा.

**बोधकथा :**

## पावसाचा थेंब

ढगातून गळून पडलेल्या एका पावसाच्या थेंबाने आपल्या नशीबाविषयी जोरात कुरकुर केली. तो म्हणाला, 'माझं जीवन किती निरुपयोगी आहे. आता माझा अंत होणार ! मी कोणालाही माहीत नाही, मी काही केलं नाही. मला आकाशातून हाकलून दिलं आहे. मी मुळी जन्मालाच आलो नसतो तर बरं झालं असतं ?'

तो थेंब नशिबाने एका शिंपल्यात पडला व लगेच ते शिंपले मिटले. पुढे कित्येक वर्षांनी त्या शिंपल्यातून एक अति मौल्यवान मोती निघाला व पावसाच्या थेंबाचा बादशहाच्या मुकुटात शोभणारा मोती बनला.

**तात्पर्य:** हलक्या कुळात जन्म घेतलेला माणूस स्वत:च्या तेजाने मोठेपणा मिळवतो.

## महापरिनिर्वाण दिन माहिती:

आपली राज्यघटना घडवण्यात डॉ भीमराव रामजी आंबेडकर यांचा सिंहाचा वाटा होता. त्यामुळेच त्यांना भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाते. बाबासाहेब हे एक महान समाजसुधारक आणि अभ्यासक होते. 6 डिसेंबर 1956 रोजी त्यांचे दिल्लीतील त्यांच्या घरी निधन झाले, आणि आज त्यांची पुण्यतिथी आहे. त्यांची पुण्यतिथी महापरिनिर्वाण दिवस म्हणून साजरी केली जाते.

### महापरिनिर्वाण म्हणजे काय?

महापरिनिर्वाण हे बौद्ध धर्माचे प्रमुख तत्व आणि ध्येय आहे. याचा शब्दशः अर्थ 'मृत्यूनंतरचे निर्वाण' असा होतो. बौद्ध धर्मानुसार, जो निर्वाण प्राप्त करतो तो सांसारिक वासना आणि जीवनातील वेदनांपासून मुक्त होईल आणि जीवनाच्या चक्रातून मुक्त होईल म्हणजेच तो पुन्हा पुन्हा जन्म घेणार नाही.

### डॉ.आंबेडकरांनी बौद्ध धर्म कधी स्वीकारला?

संविधानाचे शिल्पकार डॉ.भीमराव आंबेडकर यांनी वर्षानुवर्षे बौद्ध धर्माचा अभ्यास केला होता. त्यानंतर 14 ऑक्टोबर 1956 रोजी त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला. त्यांच्यासोबत त्यांचे सुमारे ५ लाख अनुयायीही बौद्ध धर्मात सहभागी झाले होते.

### डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे अंत्यसंस्कार कुठे झाले? चैत्यभूमी कुठे आहे ?

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पार्थिवावर मुंबईतील दादर चौपाटीवर बौद्ध धर्माच्या नियमांनुसार अंत्यसंस्कार करण्यात आले. ज्या ठिकाणी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले ते समाधी स्थळ आता चैत्यभूमी म्हणून ओळखली जाते.

### डॉ बाबासाहेब आंबेडकर त्यांची पुण्यतिथी महापरिनिर्वाण दिवस म्हणून का साजरी केली जाते?

त्यांनी दलितांची स्थिती सुधारण्यासाठी खूप काम केले आणि अस्पृश्यता संपवण्यात त्यांचा मोठा वाटा होता. म्हणूनच त्यांना बौद्ध गुरू मानले जाते. त्यांचे गुरू भगवान बुद्धाइतकेच प्रभावी आणि सद्गुरु होते असे त्यांचे अनुयायी मानतात. डॉ. आंबेडकरांना त्यांच्या कार्यामुळेच निर्वाण मिळाले असे ते मानतात. त्यामुळेच त्यांची पुण्यतिथी महापरिनिर्वाण दिन म्हणून मानली जाते.

### महापरिनिर्वाण दिन कसा साजरा केला जातो?

आंबेडकरांचे अनुयायी आणि इतर भारतीय नेते यावेळी चैत्यभूमीला भेट देतात आणि भारतीय राज्यघटनेच्या शिल्पकाराला श्रद्धांजली अर्पण करतात.